सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) सहाय्यित "नव तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प" राबविण्याकरिता निधी उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-माविम-२०२६/प्र.क्र.५४ (ई-१७५७५४९)/का-१०
नविन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ०६ ऑगस्ट, २०२६.

संदर्भ :-

१. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.माविम-२०१६/प्र.क्र.६७/का-१०, दि.०८.०१.२०१९, दि.०४.०१.२०२१ व दि.२६.०८.२०२४,
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६,
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.११०/२०२३/ कोषा प्रशा-५, दि.१४.०२.२०२४,
४. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.बीजीटी-२०२४/प्र.क्र.२९/का-४, दि.०९.०९.२०२४.

शासन निर्णय :-

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) सहाय्यित “नव तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प” राबविण्याकरीता आयफॅडचा हिस्सा म्हणून विवरणपत्रातील रकाना क्रमांक क्रमांक (२) मधील लेखाशीर्ष/ उद्दिष्टाकरिता रकाना क्रमांक (४) प्रमाणे एकूण **₹ १९.२५ कोटी (अक्षरी रुपये एकोणीस कोटी पंचेवीस लक्ष फक्त)** इतका निधी महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) वितरीत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये कोटी)

अ.क्र.	प्रधान/ लेखाशिर्ष / संगणक सांकेतांक/ उद्दिष्ट	अर्थसंकल्पीय तरतूद सन २०२६-२७	या आदेशान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी
(१)	(२)	(३)	(४)
१	मागणी क्रमांक एक्स-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०३, महिला कल्याण, (०३) इतर योजना, (०३) (१३) नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प राबविण्याकरिता माविमसाठी सहायक अनुदान (आयफॅड हिस्सा) (कार्यक्रम) (२२३५ सी ३४१) ३१,सहायक अनुदाने (वेतनेत्तर)	**७७.००**	**१९.२५**

२. सदर निधीमधून आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) सहाय्यित "नव तेजस्विनी- महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प" अंतर्गत प्रत्यक्षात हाती घ्यावयाच्या शासनमान्य घटकांवर खर्च होईल, याची दक्षता व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, बांद्रा, मुंबई यांनी घ्यावी.

३. सदर निधी महिला आर्थिक विकास महामंडळास वितरीत करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालयास व शासनास सादर करण्याची दक्षता व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, बांद्रा, मुंबई यांनी घ्यावी.

५. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांच्या सहीने तयार केलेले व सह सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले देयक अधिदान व लेखा अधिकारी यांना सादर करावे. सह सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर यांनी सादर केलेल्या देयकावर प्रतिस्वाक्षरी करण्याचे अधिकार दिलेले आहेत.

६. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना म.को.नि. नमुना क्रमांक ४४ देयकांव्दारे राज्याच्या एकत्रित निधीतून २७- लहान बांधकामे, ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर), ३३-अर्थसहाय्य, ३५ भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान, ५०-इतर खर्च, ५३-मोठी बांधकामे आणि वित्त विभागाव्दारे वेळोवेळी घोषित करण्यात येतील अशा अन्य उद्देश शीर्ष (Object Head) अंतर्गत आहरित केल्या जाणाऱ्या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी “आभासी वैयक्तिक ठेव लेखा [Virtual Personal Deposit Account (VPDA)]” ही व्यवस्था व कार्यपध्दती लागू करण्यात यावी, अशा सूचना वित्त विभागाने संदर्भाधीन दि.१४.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये दिल्या आहेत. त्यानुसार महिला व बाल विकास विभागाने संदर्भाधीन दि.०९.०९.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सदर उद्देश शीर्ष (Object Head) अंतर्गत आहरित केल्या जाणाऱ्या सहायक अनुदानाच्या निधीचा विनियोग करण्यासाठी “आभासी वैयक्तिक ठेव लेखा [Virtual Personal Deposit Account (VPDA)]” ही व्यवस्था व कार्यपध्दती लागू करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच, सदर शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद आहरण व संवितरण अधिकारी यांना सदर शासन निर्णयाव्दारे आभासी वैयक्तिक लेखा प्रशासक म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यामुळे वित्त विभागाच्या दि.१४.०२.२०२४ व महिला व बाल विकास विभागाच्या दि.०९.०९.२०२४ च्या शासन निर्णयातील नमूद अटी व शर्तींचे पालन करुन आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक यांनी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी महिला आर्थिक विकास महामंडळास वितरीत करावा.

७. सदर निधी खर्च करतांना महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या तसेच नियोजन व वित्त विभागाने यापूर्वी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व प्रचलित निकष, वित्तीय अधिकारांचे प्रत्यायोजन तसेच वित्त विभागाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक

सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, बांद्रा, मुंबई यांनी घ्यावी.

८. वितरीत करण्यात आलेल्या रकमेची प्रतिपूर्ती महिला आर्थिक विकास महामंडळाने वेळोवळी केंद्र शासनामार्फत आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधी (IFAD) कडून प्राप्त करुन घ्यावी.

९. सदर शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आलेला निधी चालू वित्तीय वर्षात खर्च करण्याची तसेच अखर्चित राहणारा निधी दि.३१.०३.२०२७ पूर्वी समर्पित करण्याची दक्षता व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, बांद्रा, मुंबई यांनी घ्यावी.

१०. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.२२५/व्यय-६, दि.२८.०७.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

११. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०८०६१७१७२९२९३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL DEORAO SARDAR

Digitally signed by SUNIL DEORAO SARDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=c0098eb68042c66b72115bc62ef9206ece42981aab126657128d7cadca447533, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=778B75C2C14BADBE6832D77601CF425AA7979B907650965C83919DBA7DC458C7, cn=SUNIL DEORAO SARDAR
Date: 2026.08.06 18:09:26 +05'30'

(सुनिल सरदार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२. व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१,
३. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
४. महालेखापाल- महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
५. मा.मंत्री (म.व बा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
७. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
८. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई उपनगर,
९. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सदर निधी बीडीएस प्रणालीवर वितरीत करण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
१२. निवड नस्ती, का-१०.